# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७ / चैत्र २, १९३९ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

**मौजे डोल्हारा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील पाझर तलावाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत**

**(१) * ३०५६९ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २२९५७ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोल्हारा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने सन २०११-१२ मध्ये पाझर तलावाला रुपये १८२.७२ लाख इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास मंजूरी देऊन दिनांक २४ जानेवारी, २०१२ रोजी कार्यादेश निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाझर तलावाचे काम संथगतीने सुरू असून मागील वर्षभरापासून हे काम संपूर्णत: बंद पडलेले असून ४ वर्षात केवळ ६० टक्के काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बंद पडलेले काम आठवडयाभरात सुरू करण्यात यावे असा इशारा ग्रामस्थांनी लघू पाटबंधारे विभागाचे उप अभियंता यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एका निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पाझर तलावाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी ग्रामस्थांनी सन २०१२ पासून रास्ता रोको, उपोषणे, आंदोलने केलेली आहेत, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) सदर कामास दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.
(२) होय.

तलावाची उंची वाढवण्याचे प्रस्तावामुळे, सांडव्याचे ठिकाण क्षेत्रिय परिस्थितीमुळे बदलल्याने, सर्वसाधारण आराखडा, सांडवा संकल्पन आणि तलाव काटछेद या प्रस्तावांच्या मान्यतेअभावी काम रखडले आहे.
(३) होय.
(४) तलाव काटछेद संकल्पनासाठी प्रदेश कार्यालय, पुणे मार्फत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. मंजुरीची कार्यवाही सुरु आहे.

काम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने ग्रामस्थांना अवगत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीबांना मिळणारे पैसे शासकीय कर्मचारी हडप करीत असल्याबाबत

**(२) * २८२२० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरिबांना मिळणारे पैसे शासकीय कर्मचारी हडप करीत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरजू गरीब रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांची आर्थिक कुचंबणा होत आहे, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची संपूर्ण कार्यप्रणाली ऑनलाईन स्वरुपाची असुन योजनेंतर्गत गरीबांना मिळणारे पैसे शासकीय कर्मचारी हडप करीत असल्याची अशी कोणतीही बाब दिनांक ११/०१/२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील अनेक रोगनिदान (डायग्नोसिस) सेंटरच्या चुकीच्या निदानामुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३) * ३०३४४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अनेक रोगनिदान (डायग्नोसिस) सेंटरमध्ये रुग्णांचे चुकीचे निदान करणे, अतिरिक्त पैसे घेणे, यासह तज्ञ डॉक्टरांची स्वाक्षरी नसताना रिपोर्ट देण्याचे प्रकार होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रोगनिदान (डायग्नोसिस) सेंटर्सच्या चुकीच्या निदानामुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन रोगनिदान (डायग्नोसिस) सेंटर्सवर नियंत्रण आणण्यासाठी कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोलवी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील धरमतर खाडीत खारफूटीची कत्तल करुन अनधिकृत जेट्टीचे बांधकाम सुरु केल्याबाबत**

**(४) * ३००५१ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडखळ जवळील डोलवी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे जेएसडब्ल्यू धरमतर पोर्ट लि.या कंपनीने धरमतर खाडीत खारफुटीची कत्तल करुन जेट्टीचे बांधकाम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने कोणत्याही शासकीय यंत्रणा तसेच सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेतलेली नसल्याने सामाजिक कार्यकर्ते श्री.सुरेंद्र ढवळे यांनी गेली दोन वर्षापासून मा.बंदरे मंत्री, जिल्हाधिकारी, रायगड तसेच गृह विभाग (बंदरे) यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) जे. एस. डब्ल्यू धरमतर पोर्ट लि. कंपनी १९९५ पासून जेट्टी उभारणीचे काम करीत आहे.

मौजे खारमाचेला ता.पेण येथील गट नं. ९४ या सरकारी खाजण जमिनीतील कांदळवनाची तोड केल्याबाबत सदर कंपनीचे व्यवस्थापकांविरुध्द वडखळ पोलीस ठाणे ता.पेण येथे एफ.आय.आर. क्र.०१/२०१५, दिनांक १०/४/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) याप्रकरणी श्री.सुरेंद्र ढवळे यांच्या दिनांक ११/०७/२०१५ रोजीच्या तक्रारी मा.मंत्री, बंदरे तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

(३) सदर जेट्टी उभारणीसाठी पर्यावरण व वन विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील पत्र दिनांक ४/१/१९९५ अन्वये परवानगी (Environmental Clearance) देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १३/५/२०१४ अन्वये गाळाचे वेस्ट मटेरियलचे विल्हेवाट करिता अटी व शर्तीसह परवानगी देण्यात आली आहे.

दिनांक ९/२/२०१७ रोजीच्या स्थळपाहणी अहवालानुसार सदर जमिनीमध्ये कंपनीने कांदळवनाची तोड केल्याबाबत आढळून आलेले नाही.

सन २०१४ मध्ये श्री. सुरेंद्र वामन ढवळे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.१०२/२०१४ दाखल केली असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. तसेच मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथे श्रीमती समिता राजेंद्र पाटील यांनी जे.एस.डब्ल्यू कंपनीविरुध्द सन २०१५ मध्ये संकीर्ण अर्ज क्र. २११/२०१५ दाखल केला असून श्री.व्दारकानाथ नामदेव पाटील यांनी अर्ज क्र. ५९/१५ सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### माण (जि.सातारा) तालुक्यातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिहे कठापूर योजना पूर्ण करण्याबाबत

**(५) * ३०४६९ श्री.आनंदराव पाटील : दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक २२४५८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण (जि.सातारा) तालुक्यातील उरमोडी धरणातील पाणी तीन ठिकाणी उचलून ११५ किलोमीटर वरुन कालव्याद्वारे माण तालुक्यात आणले असतानाही पूर्वेकडील अर्धा तालुका पाण्यापासून वंचित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणी समस्या सोडविण्यासाठी जिहे कठापूर योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

माण तालुक्यातील पूर्व भागासाठी जिहे कठापूर उपसा सिंचन योजना बांधकामाधीन आहे.

(२) सदर क्षेत्रास पाणी देण्याच्या दृष्टीने जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात अपुरा कर्मचारी वर्ग व अपुरा निधी उपलब्ध होत असल्याबाबत

**(६) * २७७५३ श्री.शरद रणपिसे, श्री.नारायण राणे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २३९९७ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचा तसेच जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करण्याचा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा मानस असला तरी विद्यापीठाच्या स्थापनेच्यावेळी म्हणजे सन १९९८-१९९९ मध्ये विद्यापीठाचा कारभार सक्षमपणे चालविण्यासाठी किमान ६०० कर्मचाऱ्यांची पदे आवश्यक असूनही पन्नास टक्के पदे भरलेली असल्यामुळे तसेच पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने या विद्यापीठाचा कारभार सक्षमपणे चालू शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील आरोग्य विज्ञान विद्यापीठातील अत्यावश्यक पदे भरण्यास वैद्यकीय शिक्षण विभागाने परवानगी देऊन रुपये १० कोटीची तरतूद केली, परंतू गेल्या ७ महिन्यांत ही पदे भरली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कारभार सक्षमपणे चालावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात अथवा येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठासाठी शासनाने मंजूर केलेल्या पदांसाठी १०० टक्के वेतन अनुदान देण्यात येते.

विद्यापीठाचे सेवा प्रवेश नियम सुधारीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यानंतरच ही पदे भरण्यात येतील.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुऱ्हा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदण रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७) * २८४७२ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदण रस्त्याची कामे निकृष्ट करण्यात येऊन कागदोपत्री पूर्ण दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कुऱ्हा ग्रामस्थ तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२) व (३) कु-हा ता.आर्णी येथील ग्रामस्थ तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४/११/२०१६ रोजी तक्रार केल्याची बाब खरी आहे. या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आर्णी यांनी चौकशी समिती गठित करुन तक्रारीबाबत चौकशी करण्यात आलेली आहे. याबाबत संबंधित तत्का.सचिव/सरपंच ग्रामपंचायत कु-हा व तांत्रिक अधिकारी यांचेकडून पंचायत समिती, आर्णी यांनी खुलासा मागविलेला आहे. सदर खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. चौकशीनंतर गैरव्यवहार झाला किंवा नाही, हे स्पष्ट होईल. तसेच कु-हा ग्रामस्थ यांनी सदर तक्रार खारीज करण्याबाबत पंचायत समिती, आर्णी यांना लेखी निवेदनाव्दारे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शासकीय दंत महाविद्यालय, औरंगाबाद यास बांधकामासाठी निधी मिळणेबाबत

**(८) * २८९०७ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात एकमेव शासकीय दंत महाविद्यालय, औरंगाबादला असून त्यात बीडीएसच्या ५० जागानुसार आवश्यक असणारे प्रयोगशाळेचे क्षेत्रफळ नसणे, उपकरणाची कमतरता व प्राध्यापकांची रिक्त पदे असून अनेक गैरसोई आहेत, हे खरे आहेत काय,

(२) असल्यास, इमारत, वसतिगृह, परिक्षा हॉल, सभागृह इत्यादी बांधकामासाठी शासनाने ४ वर्षापूर्वी रूपये ९ कोटीचा निधी मंजूर केला असून त्यापैकी फक्त रूपये ३ कोटी मिळाल्याने सर्व कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासकीय दंत महाविद्यालयासाठी मंजुर रक्कमेपैकी रूपये ६ कोटी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वसतिगृहाचे मूळ इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे. संस्थेतील बांधकामास आजपर्यंत रुपये ६.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून फर्निचर व इतर आवश्यक उर्वरीत कामाकरीता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात संस्थेच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाडी केंद्रात खिचडी व टी.एच.आर पुरवठा करणाऱ्या बचतगटांची देयके अदा करण्याबाबत**

**(९) * ३०५५३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाडी केंद्रात खिचडी व टी.एच.आर पुरवठा करणाऱ्या बचतगटांना माहे ऑक्टोबर, २०१६ पासून देयके अदा करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देयके मिळाली नसल्याने राज्यातील महिला बचत गट आर्थिक अडचणीत आहेत, त्यामुळे महिला बचत गटांची प्रलंबित बिले त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी रुपये २९७/- कोटीची पुरवणी मागणी मान्य करण्यात आलेली आहे व प्रलंबित बिले अदा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१०) * २६७२५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर योजनेकरिता आमदार निधीतून आणि शासनाच्यावतीने खर्च केला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेकरिता शासनाने आतापर्यंत किती व कोणकोणत्या आमदारांना निधी वितरित केला आहे, तसेच शासनाच्यावतीने खर्च करण्यात आलेला निधी मिळाला नसल्याने सदर योजनेतील बहुतांश कामे खोळंबलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

आमदार आदर्श ग्राम योजनेकरीता दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रुपये २ कोटी ४० लाख निधी ग्रामविकास आराखडे बनविण्यासाठी व प्रशासकीय खर्चासाठी वितरीत करण्यात आला आहे.

सदर निधी हा २८७ ग्रामपंचायतींना आराखडे बनवणेकामी प्रत्येक ग्रामपंचायतीस ५०,०००/- प्रमाणे, प्रत्येक विभागस्तरीय उपआयुक्त विकास कार्यालय रुपये ५०,०००/- व प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयास प्रशासकीय खर्चाकरीता रुपये २५,०००/- या प्रमाणे दिनांक ४/२/२०१७, दिनांक ६/२/२०१७ व दिनांक १/३/२०१७ नुसार वाटप करण्यात आला आहे. उर्वरीत ग्रामपंचायतीच्या निवड केलेल्या ग्रामपंचायतींना निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच दिनांक १/३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रुपये ४ कोटी एवढा जोडनिधी निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आमदार निधीतून घेण्यात येणाऱ्या व अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी शासनाने वितरीत केला आहे. त्याचे वाटप करण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल.

त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत आमदार महोदयांना कोणत्याही प्रकारचा आमदार निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.

जिल्हास्तरावर जिल्हा नोडल अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांचे कार्यालयामार्फत ग्रामविकास आराखडे तयार करुन घेण्यात येत असून विकास आराखडयानुसार जिल्हयाच्या नियोजन विभागाकडून निधीचे आयोजन करुन काही विकास कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## कृष्णा पाणी वाटप लवादाच्या निवाडयानुसार राज्याला पाणी उपलब्ध करण्याबाबत

**(११) * २७१४२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खो-यातील राज्याच्या वाटयाला आलेल्या अतिरिक्त ८१ टीएमसी पाण्यावर राज्याचा हक्क असल्याचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेला असून राज्याच्या ६६६ दशलक्ष घनफूट पाणी हिश्श्यात कोणीही वाटेकरी असणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उक्त आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, कृष्णा पाणीवाटप लवादानुसार राज्याला मिळणारे ६६६ टीएमसी पाणी अडविण्याबाबत रुपये १५ ते २० हजार कोटीचा निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) मा.कृष्णा पाणी तंटा लवाद-२ यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सरासरी विश्वासार्हतेने महाराष्ट्रास ६६६ दशलक्ष घनफूट पाणी अनुज्ञेय आहे. तथापि हा निर्णय अद्यापी अधिसूचित झालेला नाही.

दरम्यान तेलंगणा राज्याने आंध्रप्रदेश पुर्नगठन अधिनियम २०१४ मधील कलम ८९ अन्वये पाण्याचे फेरवाटप करणेबाबतची याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

दिनांक ०९/०१/२०१७ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळली आहे.

(३) कृष्णा पाणी तंटा लवाद-२ चा निर्णय अधिसूचित झाल्यानंतरच नवीन प्रकल्पासाठी निधीचे नियोजन करणेत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील हर्सुल धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(१२) * ३०१७९ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील हर्सुल धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या ३७७ एकर जमिनीपैकी १७७ एकर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अतिक्रमण करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन जमीन ताब्यात घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

हर्सुल धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीवर काही प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

(२) या संदर्भात तालुका भूमी अभिलेख कार्यालयामार्फत सदर जागेची मोजणी करण्यात आली असून, मोजणीचा अंतिम नकाश तालुका भूमी अभिलेख कार्यालयाकडून प्राप्त होताच सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना लाभार्थींची रक्कम मिळत नसल्याबाबत

**(१३) * २८०५२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांच्या गरोदर व स्तनपान कालावधीत आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारावा या हेतूने इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना राबविण्यात येत असतानाही भंडारा व अमरावती या दोन जिल्हयात लाभार्थी महिलांना लाभार्थींची रक्कम हस्तांतरीत होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्ह्यांमध्ये इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेला माहे जूलै, २०११ मध्ये मान्यता देण्यात आली असतांना त्याची अंमलबजावणी माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील दिड वर्षात मोहोडी तालुक्यातील २५०० महिलांना उक्त योजनेच्या लाभासाठी प्रतिक्षा करावी लागली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सदर योजनेंतर्गत केंद्र शासन, महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र. क-९-५/२०१०-IGMSY दिनांक ८/११/२०१० अन्वये राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ३०/७/२०११ रोजी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात IGMSY योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
या योजनेसंदर्भात रुपये ३०.५४ कोटीची पुरवणी मागणी सादर करण्यात आली असून केंद्र व राज्य हिस्स्यात ६०:४० असा बदल झाल्यामुळे लाक्षणिक पुरवणी मागणीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर (जि.पालघर) ग्रामिण रुग्णालयातील मुदतबाह्य औषधांच्या फेरचौकशीबाबत

**(१४) * २९७०८ श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २४८६६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मनोर (ता.जि.पालघर) येथील मनोर ग्रामिण रुग्णालयांत सन २०१५ मध्ये खरेदी केलेल्या औषधांची मुदत माहे ऑगस्ट, २०१५ नंतर संपल्यावर, औषधांच्या व्यापार नियमाप्रमाणे वितरकाकडून बदलून घेतली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा कुटुंब कल्याण, ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील व्दिसदस्यीय चौकशी समितीने तक्रारदार भुमिसेनाच्या प्रतिनिधींना पुरावे देण्याची आणि त्यांची बाजू नोंदविण्याची संधी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

तथापि, अशा आशयाची बातमी दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ९/०८/२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती.

ग्रामिण रुग्णालय, मनोर, जि. पालघर येथे सन २०१५ मध्ये स्थानिक स्तरावर खरेदी करण्यात आलेली सर्व औषधे कालबाह्य मुदतीपूर्वी वापरण्यात आलेली आहेत.

(२) प्रस्तुत प्रकरणी भुमीसेनेची कोणतीही तक्रार उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे यांच्याकडे प्राप्त झालेली नसल्याने भुमीसेनेच्या प्रतिनिधींना चौकशीसाठी बोलविण्यात आलेले नाही.

(३) दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दिनांक ९/०८/२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सहायक संचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील व्दिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

सदरहु चौकशीत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये तथ्य आढळून आले नाही. मात्र माहे एप्रिल व मे, २०१६ या कालावधीत ग्रामीण रुग्णालय, मनोर येथे रुपये २३,९३०/- इतक्या किंमतीची ९ औषधे कालबाहय झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कालबाहय झालेल्या ९ औषधांचा रुग्णालयामार्फत विहित मुदतीत वापर करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी प्रयत्न केल्याचे आढळून आले आहे. तथापि, कालबाह्य झालेली औषधे व्यवस्थित बंद खोलीत ठेवण्यामध्ये निष्काळजीपणा झाल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने संबंधित औषध निर्माण अधिकारी यांना दिनांक २६/१०/२०१६ रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे यांच्यामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आंधळेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथे मनरेगांतर्गत जलसिंचन विहिरीचे कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * २९५५७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंधळेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथे मनरेगांतर्गत तलावाच्या बुडीत क्षेत्रामध्ये जलसिंचन विहिरीचे काम सन २०१३-१४ मध्ये मंजूर करून सदर कामाच्या रुपये ५,३६,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर कामाच्या एका आठवडयात एक असे नऊ मस्टर भरून अंदाजे दोन महिने आणि काही दिवस होऊन अकुशल कामाकरीता रुपये १,९७,०००/- चे व कुशल कामाकरीता रुपये २,०३,०००/- चे असे मिळून एकूण रुपये ४,००,०००/- चे प्रत्यक्ष काम झाल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत करण्यात आली व सदर काम पूर्णत्वाचा दाखला देऊन बंद करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाकरीता रुपये ५,३६,०००/- मंजूर झाल्यामुळे व मोजमाप पुस्तकेवर रुपये ४,००,०००/- चे काम झाल्यामुळे उर्वरीत रक्कम हडप करण्यासाठी विहिरीचे आणखी काम चालू असल्याचे भासवून बोगस मस्टर तयार केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत मौजे आंधळेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथे तलावाच्या बुडीत क्षेत्रामध्ये सन २०१३ मध्ये जलसिंचन विहीरीच्या रुपये ५३६४०६/- इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर रकमेपैकी कुशल व अकुशल असे एकूण रुपये ४१७८९६/- इतका खर्च झाल्यानंतर शाखा अभियंता यांच्या बोगस सहीने ३ बोगस मस्टर काढल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणाची सहा गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत यांच्यास्तरावर चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालामध्ये ३ बोगस मस्टर आढळल्याचे व यास ए.पी.ओ, ग्रामरोजगार सेवक, क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर हे जबाबदार

असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी ग्रामरोजगार सेवक व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या सेवा समाप्त करुन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच गटविकास अधिकारी पं.स आष्टी यांना इतर जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द फौजदारी कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पातील पुणेगाव दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याचे काम सुरु करणेबाबत**

**(१६) * २७१८२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पातील पुणेगाव दरसवाडी-डोंगरगाव पोहोच कालव्याचे बंद पडलेले काम सुरु करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याचे काम पूर्ण करण्यासाठी रुपये १४० कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सदर कामासाठी गोदावरी मराठवाडा सिंचन महामंडळाकडे रुपये ४८.७५ कोटी इतका निधी उपलब्ध आहे. मात्र प्रकल्पावर अद्यावत सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च झाला आहे. प्रकल्पाचे सुधारीत प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) बंधाऱ्यातील गाळ काढण्याबाबत**

**(१७) * २८२६५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) बंधा-यातून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाणीपुरवठा केला जात असून सदर बंधारा ६० टक्केपेक्षा अधिक गाळाने भरलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बंधारा गाळाने भरलेला असल्याने पाऊस पडूनही पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होत नसल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधींनी या बंधा-यातील गाळ काढण्याकडे विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निवेदन दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मोहने बंधा-याच्या खालील बाजूस पाणीसाठा वाढवण्यासाठी प्रस्तावित असलेला नवीन बंधारा बांधण्याबाबत संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत अशीही विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

सदर निवेदन हे मोहने बंधाऱ्यात वाढणारी जलपर्णी काढून टाकून सुरक्षित पाणी पुरवठा करणेबाबत आहे.

(३), (४) व (५) अशी विनंती केलेली नाही. तथापि उल्हासनदी पात्रामध्ये पाच कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधणे प्रस्तावित आहे. या बंधाऱ्याच्या बांधकामासाठी लागणारा निधी पाणी वापराच्या प्रमाणात कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व शहाड टेमघर प्राधिकरण (स्टेम) यांनी द्यावयाचा आहे. त्यास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची संम्मती प्राप्त आहे. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व शहाड टेमघर प्राधिकरण यांची सहमती अप्राप्त आहे.

-----------------

## नाशिक विभागात जलयुक्त शिवार योजनेत मंजूर केलेल्या कामांना अतिरिक्त निधी मिळण्याबाबत

**(१८) * २७६९५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५६२७ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागात जलयुक्त शिवार योजनेत सन २०१६-२०१७ या वर्षासाठी मंजूर केलेली कामे पुर्ण करण्याकरिता जलसंधारण विभागाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नाशिक विभागास रुपये १४०.८० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभागातील जलयुक्त शिवार योजनेच्या सन २०१६-२०१७ मधील मंजुर कामासाठी रुपये ६०० कोटीचा निधी कमी पडत असून या वर्षाची कामे पूर्ण करण्याकरिता रुपये ४०० कोटी अतिरिक्त निधी मिळावा अशी मागणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दुष्काळ व अवर्षणप्रवण, टंचाई क्षेत्रात जलयुक्त शिवार योजनेची सफलता व उपयुक्तता व्यापक प्रमाणात असल्याने नाशिक विभागाच्या या योजनेकरिता अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये नाशिक विभागास रुपये १४०.८० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे शिवणसई (ता.वसई, जि.पालघर) येथील संरक्षित वन जमिनीवर अनधिकृत बांधकामास परवानगी नाकारल्याबाबत**

**(१९) * २९६४४ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ९६१५ ला दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवणसई (ता.वसई, जि.पालघर) येथील संरक्षित वने सर्वे नं.८७ मध्ये बेकायदेशीर उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे व औद्योगिक वापरासाठी महसूल विभागाकडून देण्यात आलेल्या परवानगी रद्द करणेबाबत मा. मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली होती, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे शिवणसई (ता.वसई, जि.पालघर) येथील संरक्षित वने सर्वे नं.८७ मध्ये बेकायदेशीर उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे व औद्योगिक वापरासाठी महसूल विभागाकडून देण्यात आलेल्या परवानगी रद्द करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८/०१/२०१५ तसेच दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांना विनंती केली आहे. परंतु प्रश्नांत नमूद दिनांक १५/०१/२०१६ रोजीचे मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांना उद्देशून लिहिलेले पत्र आढळून येत नाही. तथापि, मा. मुख्य सचिव यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १५/१२/२०१६ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) व (३) मौजे शिवणसई, ता.वसई येथील स.नं. मधील प्लॉट नं. १८, १९, २१ व २२ या मिळकतीला वनसंज्ञा लागू असल्याने प्रकरणी जमिनीच्या वापरात बदल करणेबाबत उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिनांक ७/१२/२०१२ रोजी दिलेले आदेशाचे मा.दिवाणी न्यायालय वसई यांचेकडील आर.सी. एस. नं. १३००४९२/२०१३ च्या निर्णयास अधिन राहून पुनर्विलोकन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या दिनांक ३१/३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, वसई यांना कळविले आहे.

उपविभागीय अधिकारी, वसई यांनी केलेल्या चौकशीत ज्या जमिनीस ६३-१ अ खाली खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ परवानगी दिलेली आहे, ती जागा आज रोजी मोकळी असून तिचा अकृषिक प्रयोजनार्थ वापर केलेला नाही, असे निदर्शनास आले आहे. उपविभागीय अधिकारी, वसई यांनी सदर पुनर्विलोकन प्रकरणी दिनांक १०/३/२०१७ रोजी सुनावणी आयोजित केली आहे. तसेच मा. दिवाणी न्यायालय, वसई यांचेकडे दाखल असलेल्या दाव्यात पुढील सुनावणी दिनांक २२/३/२०१७ रोजी आहे.

-----------------

**पवनी पंचायत (ता.पवनी, जि.भंडारा) समिती अंतर्गत पालोरा गावातील रहिवाशांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२०) * २९१०६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी पंचायत (ता.पवनी, जि.भंडारा) समिती अंतर्गत पालोरा ग्रामपंचायत क्षेत्रातील रहिवासी हे गेली वीस वर्षापासून घरकुल योजनेच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नसल्याने अनेक कुटुंब घरे नसल्याने दूरवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उन्हाळे (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) गावाला "क" पर्यटनाचा दर्जा देऊन सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) * ३००६९ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हाळे (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे राजापुरची गंगा व वर्षभर अहोरात्र वाहणारा गरम पाण्याचा झरा यामुळे या गावाला शासनाने "क" पर्यटनाचा दर्जा जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदर गंगाक्षेत्र दुर्लक्षित असून तेथे सोईसुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या क्षेत्राची शासनाने पाहणी केली आहे काय, सदर क्षेत्राचा तात्काळ सर्वांगिण विकास होण्यासाठी तसेच त्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) राजापूर तालुक्यातील उन्हाळे येथील गंगातीर्थ व गरम पाण्याचे कुंड या स्थळांचा 'क' वर्ग पर्यटनस्थळामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) गंगातीर्थ येथे जाणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आलेले आहे. त्यासाठी रुपये ३६.८९ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच गंगातीर्थ क्षेत्राचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून तो विचाराधीन आहे.

-----------------

**मौ.पोटा बु. व कांडली बु. (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) येथील आरोग्य उपकेंद्रातील गैरसोई दूर करण्याबाबत**

**(२२) * ३०४०२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पोटा बु. व कांडली बु. (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) येथील आरोग्य उपकेंद्रातील रिक्त पदांमुळे व स्थानिक कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे गर्भवती माता व वृध्द रुग्णांना उपचार मिळत नसल्याने उपचाराकरिता त्यांना भोकर व हिमायतनगर येथील खाजगी दवाखान्यात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर उपकेंद्रात कोणतीही सेवा उपलब्ध नसल्याने या उपकेंद्रांतर्गत ११ गावे येत असून गावातील नागरिकांना उपचारासाठी पायपीट करावी लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

मौ.पोटा बु. व कांडली बु. या २ आरोग्य उपकेंद्रामध्ये प्रत्येकी ३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी प्रत्येकी २ पदे कार्यरत आहेत. तसेच २ आरोग्य उपकेंद्रामध्ये प्रत्येकी एक आरोग्य सेवक हे पद रिक्त आहे. रिक्त असलेल्या पदाची सेवा मुख्यालयी असलेल्या आरोग्य सेविका देत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

उपकेंद्र पोटा (बु) अंतर्गत ८ तर उपकेंद्र कांडली (बु) अंतर्गत १२ गावे येतात. मात्र माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उपचारासाठी येणाऱ्या नागरीकांना पायपीट करावी लागत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) जिल्हा परिषद, नांदेड यांना रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन सूचना देण्यात येत आहे.

-----------------

## येऊशी (जि.उस्मानाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केद्रांतील शस्त्रक्रियागृह सुरु करुन इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * ३०३७२ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊशी (जि.उस्मानाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केद्रांतील शस्त्रक्रियागृह मागील पाच महिन्यापासून बंद असल्यामुळे रुग्णांच्या शस्त्रक्रिया बंद पडल्याने रुग्णांसह नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रुग्णालय इमारतीचा दोन ठिकाणी स्लॅब कोसळला असून रुग्णांसह नातेवाईकांचे प्राण धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राथमिक आरोग्य केद्रांची दुरुस्ती करुन येथील शस्त्रक्रियागृह कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य कैंद्र येडशी, जि.उस्मानाबाद हे दिनांक ७/११/१९८५ पासून कार्यरत आहे. सदर रुग्णालयाची इमारत जुनी असल्यामुळे अपघात होऊ नये म्हणून माहे सप्टेंबर, २०१६ पासून शस्त्रक्रियागृह बंद ठेवण्यात आलेले आहे. प्राथमिक आरोग्य कैंद्र दहिफळ, ता. कळंब व शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय, उस्मानाबाद येथील रुग्णालयामध्ये येडशी प्राथमिक आरोग्य कैंद्रांतील ९० रुग्णांच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रुग्णांसह नातेवाईकांची गैरसोय झालेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य कैंद्राच्या इमारतीचा स्लॅब कोसळलेला नाही. मात्र इमारतीच्या छताचे प्लास्टर पडलेले आहेत. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हैसाळा धरणाचे पाणी मंगळवेढा शहराला मिळणेबाबत**

**(२४) * २९८५९ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळा या धरणाचे पाणी मंगळवेढा शहरातील नागरिकांना पिण्यासाठी व शेतीवापरासाठी देण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरण पूर्णत्वास येऊन अद्याप मंगळवेढा (जि.सोलापूर) या शहराला पाण्याचा लाभ घेणे शक्य झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाचे पाणी मंगळवेढा शहरातील नागरिकांना उपलब्ध होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशंत: खरे आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत म्हैसाळ उपसा सिंचन योजनेव्दारे मंगळवेढा तालुक्यातील हुन्नूर, लोणार, इटकरवाडी, मारोळी, जंगलगी, सलगर (खुर्द) सलगर (बु.) या सात गावांच्या ६००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असून, यासाठी १.२७ अघ.फू. पाणी वापर प्रस्तावित आहे. सदर पाणी वापर हा फक्त सिंचनाकरीता प्रस्तावित असून, यामध्ये पिण्याचे पाण्याची तरतूद नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२५) * २६९४२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सर्वात महत्वाकांक्षी तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पातील धरणग्रस्तांच्या वन टाईम सेटलमेंट व वारंवार फुटणारे कालवे यामुळे कष्टकरी शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करुन हा प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

५२४ पात्र धरणग्रस्तांपैकी महाराष्ट्र व गोवा राज्याकडून अनुक्रमे ४८२ व २८८ धरणग्रस्तांच्या खात्यावर रक्कम जमा करणेत आलेली आहे. उर्वरीत धरणग्रस्तांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तिलारी आंतरराज्य प्रकल्पाच्या डावा व उजव्या कालव्याची कामे सन १९८३ मध्ये पूर्ण झाली आहेत. प्रकल्पाच्या उजवा व डावा कालव्यातून अनुक्रमे २००१ व २००३ पासून अव्याहत पाणीपुरवठा सुरु असल्याने काही ठिकाणी कालवे फुटण्याच्या घटना घडल्या आहेत. तथापी युध्दपातळीवर त्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(२) तिलारी प्रकल्पाचा प्रथम प्राधान्य धर्तीवर प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत समावेश करण्यात आला असून मार्च, २०१८ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कारसा पोहरेगाव बंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२६) * २७६२४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातुर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा नदीचे खोलीकरण व रूंदीकरणाचे काम लोकसहभागातून हाती घेतल्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुपये ३ कोटी सदर कामास देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, शासनाने आपले काम स्वतंत्र जागेत, स्वतंत्र्यरित्या करावे, अशी सूचना जलयुक्त लातूर समितीने केल्यानंतर जिल्हाधिकारी, लातुर यांनी कारसा पोहरेगाव या बंधाऱ्यात काम केले, मात्र सदर काम पूर्णपणे नियमबाह्य करण्यात आले असून यात शासकीय निधीचा गैरव्यवहार झाल्याचे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सीबीआय चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी केली आहे, त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून झालेल्या कामाचे प्राचार्य पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन या त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात आले आहे.

या कामांचे Electronic Total Station (ETS) मशिन वापरुन काम सुरु होण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर Levels घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे अचूक मोजमाप करण्यात आले आहे. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या त्रयस्थ संस्थेमार्फत त्याची परिमाण व गुणवत्ता तपासून

प्रमाणित करण्यात आलेली आहे. सदर कामे सुरू होण्यापूर्वी, सुरू असताना व काम झाल्यानंतरचे GPS Tagged फोटो घेण्यात आले आहेत.

(३) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालात कामाची गुणवत्ता (तांत्रिकदृष्टया) व अभिलेखे योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परिक्षेला "नीट" परिक्षा लागू करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२७) * २७१४१ प्रा.अनिल सोले, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २४८०६ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिता "नीट" परिक्षा देणे अनिवार्य करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी व इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेश कुठल्या प्रवेश परीक्षेच्या आधारे होणार हे वैद्यकिय शिक्षण विभागाने निश्चित केले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक औषधनिर्माण शास्त्राचे सन २०१७ च्या शैक्षणिक वर्षाचे प्रवेश स्वतंत्र सीईटीद्वारे होणार किंवा कसे याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाप्रमाणे इतर आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशही सन २०१७-१८ पासून 'नीट' परीक्षेच्या धर्तीवर करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

(३) वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाप्रमाणेच आयुर्वेदिक, होमिओपॅथीसह उर्वरित सर्व आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात 'नीट' या अखिल भारतीय स्तरावरील सामाईक प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे करण्यात येणार आहे.

तसेच, सन २०१७-१८ मध्ये औषधनिर्माणशास्त्र व अभियांत्रिकी या दोन्ही पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकच सामाईक प्रवेश परीक्षा (MHT-CET २०१७) आयोजित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ऐनारी, कुंभवडे व करुळ (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) या लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत मंजूर धरणांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२८) * ३०२८० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐनारी, कुंभवडे व करुळ (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) या धरणांची कामे शासनाच्या लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत सन २०१० मध्ये मंजूर झाली असून सध्या ही कामे अर्धवट स्थितीत बंद पडलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचा ठेका वॉटर फ्रन्ट कन्स्ट्रक्शन कंपनीने ठेकेदार हत्ती यांना दिले असून, सदर कंपनीच्या संचालकांनी धरणाची अपूर्ण कामे पूर्ण दाखवून शासनाला रुपये ३ कोटी ७७ लाखांची बनावट देयके सादर करुन शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील लघु पाटबंधारे योजना ऐनारी व कुंभवडे या दोन योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

लघु पाटबंधारे योजना करुळ (जामदारवाडी) या योजनेचे काम सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी सद्य:स्थितीत बंद आहे.

(२) व (३) याबाबत या विभागाने दिनांक ०७/०८/२०१५ चे पत्रान्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून सविस्तर चौकशी अहवाल मागवला आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वांद्रे (पूर्व), मुंबई येथे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत**

**(२९) * ३०१०५ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व), मुंबई येथील शासकीय वसाहतीतील शासकीय रुग्णालयामध्ये भारतनगर, निर्मलनगर, बेहरामपाडा येथील अनेक रुग्ण उपचारासाठी येतात, त्यामुळे या रुग्णालयावर मोठा ताण पडल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी या परिसरात सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे, मुंबई या शासकीय रुग्णालयात भारतनगर, निर्मलनगर, बेहरामपाडा येथील अनेक रुग्ण उपचारासाठी येतात, हे खरे आहे. तथापि सदर रुग्णालयावर ताण पडून रुग्णांची गैरसोय होते हे खरे नाही.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर केंद्राच्या परिसरात सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारळी नदीवरील (ता.पाटण, जि.सातारा) धरणाचे निरीक्षण गॅलरीजवळील दरवाज्याचे बॉनेट तुटल्याबाबत**

**(३०) * ३०४७८ श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळी नदीवरील (ता.पाटण, जि.सातारा) धरणाचे निरीक्षण गॅलरीजवळील दरवाज्याचे बॉनेट अचानक तुटल्याने धरणातील सुमारे १ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग होवून तारळी नदीला पूर येवून मोठया प्रमाणात शेतीचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर धरणाचा दरवाजा बसविण्याबाबत व नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे, दिनांक ०६/०१/२०१७ रोजी सकाळी निरीक्षण गॅलरीतील बॉनेट गेट अचानक तुटल्याने विमोचकातून अंदाजे ३०० क्युसेक्स इतका विसर्ग वाहत होता. तो त्याच दिवशी आपत्कालीन व्दार बसवून बंद केला आहे. या विर्सगामुळे नदीस पूर आलेला नव्हता तसेच शेतीचे नुकसान झालेले नाही.

(२) तुटलेले गेट दुरुस्त करण्याची कार्यवाही यांत्रिकी विभागाकडून तातडीने सुरू करण्यात आली आहे. ती मार्च, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतीचे नुकसान झालेले नसल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पातून मराठवाडयाला पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याबाबत

**(३१) * २७७९६ श्री.शरद रणपिसे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पातून मराठवाडयाला २१ टिएमसी पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असूनही शासनाने २१ टिएमसी ऐवजी केवळ ७ टिएमसी पाणी मराठवाडयाला देण्याचे पत्र मा.मुख्यमंत्री यांनी मा.राज्यपाल महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, या योजनेसाठी यंत्रणा उभारणे व निधीचे नियोजन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

शासनाने दिनांक ०७/०७/२००९ च्या पत्रान्वये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या २३.६६ अ.घ.फु. पाणी वापराच्या सुधारीत जल नियोजनास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे प्रकल्पाचे रुपये ४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास दिनांक २७/०८/२००९ अन्वये शासनाने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करावयाचे असून प्रथम टप्पा ७ अ.घ.फु. पाणी वापराचा व व्दितीय टप्पा १६.६६ अ.घ.फु. पाणी वापराचा आहे. प्रथम टप्पा पाणी वापराची उर्वरीत किंमत रुपये ४८१७ कोटी आहे. सदर कामे ४ वर्षाच्या कालबध्द मर्यादेत पुर्ण करता यावीत या उद्देशाने कामासाठी लागणारा निधी हा मा.राज्यपाल महोदयांच्या निधी वाटपाचे सुत्रा बाहेर ठेवण्याची विनंती मा.राज्यपाल महोदयांना करण्याचा निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये झालेला आहे. त्यानुसार दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी उपरोक्त निधी मा.राज्यपाल महोदयाचे निधी वाटप सुत्राच्या निर्देशाबाहेर ठेवण्याबाबत विनंती केलेली आहे.

(२) या प्रकल्पाचे काम करण्यासाठी उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ उस्मानाबाद अंतर्गत २ विभाग व औरंगाबाद पाटबंधारे मंडळांतर्गत १ विभाग कार्यरत आहे व सध्या ही अस्थापना पुरेशी आहे. मा.राज्यपाल महोदयांनी सन २०१७-१८ निदेशात कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठीचा निधी निदेशाबाहेर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील वन विभागाच्या जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(३२) * २७२५० श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील वन विभागाच्या सुमारे २२६ हेक्टर जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमण करुन जमीन हडपल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे जिल्हयातील वन विभागाच्या २२६ हेक्टर जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ठाणे जिल्ह्यातील वन विभागाच्या जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमण करुन जमीन हडपल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे नाही. मात्र ठाणे जिल्ह्यात ३७३ हेक्टर वन जमिनींवर अतिक्रमण झालेले आहे.
(२) वन हक्क अधिनियम, २००६ च्या तरतूदीनुसार वैयक्तिक दावे प्रलंबित असताना अतिक्रमण निष्कासित करता येत नाही. ज्या अतिक्रमीत वनजमिनींवर वन हक्क अधिनियम, २००६ अंतर्गत दावे मान्य करण्यात आले आहे अथवा दावे निर्णयासाठी प्रलंबित आहे, असे क्षेत्र वगळून उर्वरित वनक्षेत्रावरील प्राधान्याने अनिवासी व निवासी अतिक्रमणेही निष्कासित करणेबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## पिंपळखुटा ग्रामपंचायतीमार्फत (ता.पातूर, जि.अकोला) सामाजिक वनीकरण विभागांतर्गत केलेल्या वृक्ष लागवडीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * २९२५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळखुटा-राहेर (ता.पातूर, जि.अकोला) या ३ कि.मी. अंतराच्या दोन्ही बाजूस पिंपळखुटा ग्रामपंचायतीने सामाजिक वनीकरण विभागांतर्गत १८०० वृक्षांची लागवड सन २०१५ च्या पावसाळ्यापूर्वी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृक्ष लागवडीच्या ठेकेदाराने निकृष्ट दर्जाची वृक्ष लागवड केली असून त्यापैकी मोजकीच झाडे जिवंत असताना सर्व झाडे जगलेली असल्याचे कागदपत्रांद्वारे दर्शवून देयके मंजूर करुन घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निधीचा अपहार करणाऱ्या ठेकेदारावर तसेच त्यास मदत करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

पिंपळखुटा-राहेर ता.पातुर येथे ग्रामपंचायती मार्फत सन २०१६ मध्ये मग्रारोहयो अंतर्गत वृक्ष लागवडीचे काम करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सहदरहू काम हे ठेकेदार पध्दतीने केलेले नसून ग्रामपंचायती मार्फत करण्यात आलेले आहे. वृक्ष लागवडीकरिता ग्रामपंचायतीने खड्डे खोदकाम तसेच रोपे खरेदीकरिता लोकसहभागातून रुपये ४०८२४/- खर्च झालेला आहे. तसेच वृक्ष लागवड करणे व रोपांचे संगोपन करण्याकरीता मग्रारोहयो मधून मजुराच्या मजुरीवर एकुण रुपये १४३२३२/- निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सर्पमित्रांसाठी मार्गदर्शक नियम तयार करण्याबाबत**

**(३४) * २९७१२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलापुर, नवी मुंबईचा सर्पमित्र सोमनाथ म्हात्रे याने विषारी नाग पकडल्यानंतर नागाबरोबर अतिशय धोकादायक कृत्य करताना, नाग चावल्यामुळे त्याचा दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) तसेच रिक्वींक असोसिएशन ऑफ वाईल्ड लाईफ वेलफेअर या संस्थेने ठाणे विभागाच्या वनखात्याकडे सर्पमित्रांसाठी मार्गदर्शक नियम करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

दिनांक २८/०१/२०१७ रोजी श्री.सोमनाथ म्हात्रे हे बेलापूर येथे असलेल्या गार्डनमध्ये पार्क केलेली स्कुटर घेणेस गेले असता त्यावेळी गवतात असलेल्या सापाने त्याच्या पोटावर चावा घेतला.

श्री.सोमनाथ म्हात्रे याला उपचाराकरीता महानगरपालिकेच्या वाशी येथील हॉस्पिटल मध्ये दाखल केले असता, उपचारादरम्यान त्याचा दिनांक ०२/०२/२०१७ रोजी मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे श्री.सोमनाथ म्हात्रे यांच्या अकस्मात मृत्यूची नोंद आहे. प्रस्तुत अकस्मात मृत्यूचे तपासात मयताचे नातेवाईक तथा साक्षीदार ह्यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. त्यांनी कोणावर संशय नसल्याचे व तक्रार नसल्याचे कथन केले आहे.

-----------------

**देवना (ता.येवला, जि.नाशिक) सिंचन प्रकल्प योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत**

**(३५) * २७१८४ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवना (ता.येवला, जि.नाशिक) सिंचन प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी मंजूर होवूनही माहे जानेवारी, २०१७ पर्यंत या योजनेचा सविस्तर प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे उक्त योजनेची प्राथमिक अन्वेषण टिपणी प्रलंबित असल्यामुळे या योजनेचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या अंदाजपत्रकास व सर्वसाधारण आराखड्यास प्रशासकीय मंजुरी देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय

(२) प्रकल्पाची प्राथमिक अन्वेषण टिप्पणी तयार करण्याची कार्यवाही महामंडळ स्तरावर प्रगतीत आहे.

(३) शासनाकडे अद्यापी प्रशासकीय मान्यतेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वन विभाग क्षेत्राच्या अभ्यासासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(३६) * २७६९६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५८३४ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेल्या व नसलेल्या वन विभागाच्या क्षेत्राबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचेमार्फत दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या अहवालातील शासनाच्या विचाराधीन असलेल्या शिफारशीवरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन दिनांक ०२/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही शर्ती व अटींच्या अधीन राहून प्रायोगिक तत्वावर दोन वर्षांच्या काळासाठी (सन २०१७ व २०१८) दिनांक ०१ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत बुलढाणा व जळगाव जिल्ह्यांतील ३००० पेक्षा जास्त मेंढी संख्या असलेल्या तालुक्यांसाठी वनक्षेत्रात (वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत घोषित क्षेत्र वगळून) मेंढी चराई परवाने अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमसर तालुक्यातील (जि.भंडारा) उपजिल्हा रुग्णालय परिसरातील जुनी शवविच्छेदनगृहाची इमारत जीर्णावस्थेत असल्याबाबत

**(३७) * २९३४९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर तालुक्यातील (जि.भंडारा) उपजिल्हा रुग्णालय परिसरातील जुन्या शवविच्छेदनगृहाच्या इमारतीच्या भिंतीना तडे, इमारती सभोवतालच्या परिसरात जंगली झाडे झुडूपे वाढली असून इमारतीची अनेक वर्षापासून दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवविच्छेदनगृहात उंदिर असल्याने शव सुरक्षित राहत नाहीत याबाबत स्थानिकांनी निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अशंत: खरे आहे.

सन २०१४ मध्ये नविन शवविच्छेदनगृहाचे बांधकाम करण्यात आले असून जुने शवविच्छेदन गृह पाडण्याची परवानगी प्राप्त आहे. तथापि नविन शवविच्छेदन गृहाबाबत स्थानिक नागरिकांचा विरोध असल्यामुळे त्याचा वापर सुरु करता आला नाही. त्यामुळे जुने शवविच्छेदन गृह पाडावयाचे असल्याने त्याची दुरुस्ती करता येत नाही.

परंतु शवविच्छेदन गृहाच्या परिसरात झाडे-झुडपे, गवत काढून नियमित स्वच्छता करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) अतिरिक्त नविन शवविच्छेदन गृह बांधण्यासाठी आवश्यक कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक भंडारा यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे वाईवाडी (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) येथील तलावाच्या कालव्यातून पाणी वाहून गेल्याबाबत**

**(३८) * ३०४०६ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वाईवाडी (पोटा) (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) येथील तलावात मुबलक पाणी साठा उपलब्ध असून तलावाच्या डाव्या कालव्यातून गेट क्र.०८ पर्यंत पाणी सोडले जात असून सदर कालवा गेट क्र.०८ पर्यंतची दुरुस्ती योग्यरित्या केलेली नसल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील चांदोली धरणाच्या डाव्या कालव्याची गळती थांबवून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३९) * २७५८८ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील चांदोली धरणापासून सुरु होणाऱ्या ० ते २६ किलोमीटरच्या वारणा डावा कालव्याच्या गळतीची दुरुस्ती करण्याबाबत अनेक आंदोलन केल्यानंतर सन २०१२ मध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन सदर कालव्याची दुरुस्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची दुरुस्ती निकृष्ट दर्जाची असल्याने पुन्हा कालव्याची गळती होऊन अंतरामधील १० ते १५ हजार अल्पभूधारक शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन नापीक झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ० ते २६ किलोमीटर अंतरामधील कालव्यातील पाण्याच्या गळतीमुळे बाधित होणाऱ्या हजारो अल्पभूधारक शेतकऱ्यांवर पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून व गावपातळीवरील सहकारी पाणी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडून शासनाच्या दर आकारणी पेक्षा जादा दर आकारणी करुन सक्तीने पाणीपट्टीची वसूली करण्यात येते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती शेतकऱ्यांकडून, किती रक्कमेची पाणीपट्टी वसूल करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त बाधित झालेल्या शेतकऱ्यांवर आकारण्यात येणारी पाणीपट्टी माफ करुन, वसूल केलेली पाणीपट्टी त्यांना परत देणे, सक्तीने पाणीपट्टी वसूल करणाऱ्या तसेच निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदार, अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

सदरहू कालव्याची दुरूस्ती केल्यापासून कालव्यामधुन पाण्याची गळती थांबली आहे.

(३) नाही, शासन निर्णय दिनांक २९/०६/२०११ अन्वये हंगामनिहाय पाणीपट्टीचे दर निश्चित करणेत आले आहेत. त्यानुसार सदरहू शासन निर्णयामधील तरतूदीस अधिन राहून पाणीपट्टी आकारणी व वसुली करणेत येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगाव (जि.वाशिम) येथे दलितवस्ती सुधार योजना व तांडावस्ती सुधार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४०) * २७२१८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) येथील सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये दलितवस्ती सुधार योजना, तांडावस्ती सुधार योजना, १३ व्या वित्त आयोग व पंचायत समितीस्तरावरील इतर कामात संबंधित कंत्राटदार व कनिष्ठ अभियंता यांनी गैरव्यवहार केल्याच्या आरोपावरुन कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास चौकशीचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी पूर्ण केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कनिष्ठ अभियंता व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांचेकडे सोपविण्यात आलेली आहे. चौकशी अहवाल अप्राप्त असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांकरिता स्वतंत्र महामंडळ स्थापन करणेबाबत**

**(४१) * २७९८४ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांची जबाबदारी केंद्र शासन स्वीकारण्यास तयार नसल्यामुळे या रुग्णालयांच्या कारभारासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये कामगार मोठ्या प्रमाणात उपचार घेत असून राज्यातील हजारो कामगारांना आरोग्य विषयक सुविधा मिळण्याकरिता रुग्णालयांच्या विनियोजनासाठी महामंडळाची स्थापना करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

राज्य मंत्रीमंडळाने दिनांक ३१/०५/२०१६ रोजी राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापित करण्याबाबत निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने राकावि महामंडळाची संरचना व कार्ये याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(२) होय, हे खरे आहे.

राज्यस्तरीय राकावि महामंडळ स्थापित झाल्यानंतर राकावि महामंडळ, नवी दिल्ली मार्फत अनुज्ञेय असलेला निधी राज्यस्तरीय राकावि महामंडळास थेट उपलब्ध होणार असून त्यामुळे विमा रुग्णांना वैद्यकीय सुविधा अधिक प्रभावी व सुलभतेने पुरविता येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(४२) * २७६९७ डॉ.अपूर्व हिरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २५५१० ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामिण व दुर्गम आदिवासी भागातील दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीसांना थकीत वेतन, भाऊबीजेचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी तीन दिवसात अंगणवाडी सेविकांना त्यांचे वेतन देण्याचे आदेश दिल्यानंतरही सहाशे बालमृत्यू झालेल्या पालघर, ठाणे, रायगड, नाशिक, मुंबई येथील अंगणवाडी सेविकांना माहे ऑक्टोबर महिन्याचे वेतन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय

(३) तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वेतनवाढीप्रमाणे वाढ करण्याकरिता दिनांक २०/७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीची कार्यवाही पुर्ण झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत निर्णय घेतला असल्यास, वेतनवाढीचे स्वरुप काय आहे, तसेच सदर वेतनवाढ केव्हापासून लागू करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडीसेविका व मदतनीस यांची थकीत भाऊबीज भेट, नियमित पगार व मानधनामध्ये वेतनवाढीप्रमाणे वाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) अद्यापि याबाबत निर्णय झालेला नाही.

(५) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भाऊबीज भेट थकीत नसून मानधनाची रक्कम नियमितपणे अदा करण्यात येते. वेतनवाढीप्रमाणे मानधनवाढ देण्याबाबत अद्यापि निर्णय झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव तालुक्यातील सावखेडा शिवारातील वन जमिनीचे बेकायदेशीररित्या हस्तांतरण झाल्याबाबत

**(४३) * २७७७२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव तालुक्यातील सावखेडा शिवारात असलेल्या वन जमिनी पैकी गट क्रमांक २१८ मधील १२६ एकर जमिनीच्या १८ भागांचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे सावरखेडा बु., ता. जळगाव येथील सर्व्हे नं. २१ (गट नंबर २१८) मधील ३४.८६ हे.आर वनजमिनीचे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अस्तित्वात येण्यापूर्वी महसूल विभागाकडून वाटप करण्यात आले असून त्यानुषंगाने महसूली अभिलेखात (७/१२ उताऱ्यावर) वन विभागाच्या नोंदी कमी करुन वाटप केलेल्या व्यक्तींच्या नावाच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.
(२) प्रश्नांकित क्षेत्रास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होत असल्यामुळे सदर क्षेत्राच्या निर्वणीकरण संदर्भात तसेच क्षेत्राचा निवासी, बिनशेती व औद्योगिक प्रयोजनास वापर करण्यासाठी वन (संवर्धन), अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यक कार्यवाही जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथे परसेप्ट कंपनीच्यावतीने आयोजित सनबर्ग कार्यक्रमात कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत

**(४४) * २७७९१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथे परसेप्ट कंपनीच्यावतीने माहे जानेवारी, २०१७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सनबर्न या कार्यक्रमासाठी परवानगी न घेता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यक्रमासाठी वन विभाग, पोलीस, वाहतूक विभागाची परवानगी न घेता तसेच सदर कार्यक्रमासाठी बेकायदेशीरपणे वाळू उत्खनन करुन वृक्षतोड करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीरपणे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या आयोजकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी पुणे यांनी केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथे दिनांक २८/१२/२०१६ ते दिनांक ३१/१२/२०१६ या कालावधीत "सनबर्न म्यूझिकल कार्यक्रम" यासाठी काही अटी व शर्तीवर परवानगी दिलेली होती.

संबंधितांनी सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी रस्त्याकरीता विनापरवानगी गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे दिसून आल्यानुसार, तहसिलदार हवेली यांनी संबंधितांविरूध्द रुपये ६०,५२,३८३/- एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले आहेत. तसेच बेकायदा २५ ते ३० लहान झाडांची तोड केल्याप्रकरणी संबंधितांविरूध्द वन विभागामार्फत ३ वनगुन्हे नोंदविले असून, वनक्षेत्रामध्ये बेकायदा खोदकाम केल्याप्रकरणी ४ वाहने जप्त केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.